**पोलीस पाटील यांच्या मानधनात, राज्यपाल पुरस्कार रक्कमेमध्ये तसेच सानुग्रह अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बिव्हीपी- ०८१८/प्र.क्र.९५/पोल-८**
२ मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०८ मार्च, २०१९

वाचा:- १) गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक:-बीव्हीपी-०२९९/प्र.क्र.५६/ पोल-८/दि.७ सप्टेंबर १९९९
२) गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक:-बीव्हीपी-२०००/प्र.क्र.३४/पोल-८/दि.१ऑक्टोंबर २००८
३) गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक:- बीव्हीपी- ६११/ प्र.क्र.४१८ / पोल-८, दि.१५ ऑक्टोंबर २०११

**प्रस्तावना:-**

राज्यातील पोलीस पाटील व मानधनावर असलेल्या इतर कर्मचाऱ्याचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी, त्याच्यासाठी “एकछत्र योजना” तयार करण्याकामी अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी, शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र. बैठक-२०१६/प्र.क्र.५८/ई-१० दि. १८.३.२०१७ अन्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली एक सचिव समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने राज्य शासनास सादर केलेल्या अहवालातील पोलीस पाटलांच्या संदर्भातील शिफारशी तसेच पोलीस पाटील हा महसुल यंत्रणा व पोलीस प्रशासन यामधील महत्वाचा दुवा आहे, ही बाब विचारात घेऊन, त्यांची कर्तव्ये व जबाबदारी विचारात घेता, पोलीस पाटील यांच्या मानधनात वाढ करणे, तसेच त्यांना “ राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात योजना ”, अटल निवृत्तीवेतन योजना” व “महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना” या योजनांचा लाभ देणे इत्यादी समितीने केलेल्या शिफारशी त्याशिवाय पोलीस संघटनानी वेळोवेळी केलेल्या अन्य मागण्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उप समिती गृह विभाग, शासन निर्णय दि.२८.२.२०१९ अन्वये गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची दि.१.३.२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये कल्याणकारी एकछत्र समितीने केलेल्या शिफारशी तसेच पोलीस पाटील संघटनांनी वेळोवेळी केलेल्या अन्य मागण्यासंदर्भात मंत्रीमंडळ उपसमितीने घेतलेल्या निर्णयानुसार शासन पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**शासन निर्णय:-**

१) राज्यातील पोलीस पाटील यांना सध्या देण्यात येणाऱे मानधन दरमहा रुपये ३,०००/- वरुन रुपये ६,५००/- ( अक्षरी रुपये सहा हजार पाचशे फक्त ) इतकी वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) पोलीस पाटील कल्याण निधीची (वेलफेअर फंड) स्थापना करुन त्यामध्ये पोलीस पाटील यांच्या वाढीव मानधनामधुन दरमहा रुपये ५००/- जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर

जमा रक्कमेचा विनियोग पोलीस पाटील यांना १) राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना २) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व अटल पेंशन योजना (केंद्र शासन पुरस्कृत) या योजनांचा लाभ देण्यासाठी करण्यात यावी. तथापि, या योजनेसाठीची वर्गणी रुपये ५००/- पेक्षा जास्त झाल्यास, ती पोलीस पाटील यांच्या मानधनातुन भरण्यात यावी.

३) नक्षलग्रस्त भागात नक्षलविरोधी कारवाईमध्ये पोलीस पाटील यांचा मृत्यु झाल्यास, त्यांच्या वारसांना रुपये १ लाख इतके देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदानामध्ये रुपये ५ लाख (अक्षरी रुपये पाच लाख रुपये फक्त) एवढी वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) राज्यातील पोलीस पाटील यांना राज्यपाल पुरस्कारासाठी देण्यात येणारी पुरस्कार रक्कम रुपये ५,०००/- वरुन रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंच्चवीस हजार फक्त) इतकी वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.याबाबत वाचा क्र. २) येथील शासन निर्णय दि. १.१०.२००८ च्या जोड पत्राप्रमाणे नमूद अटी /शर्ती कायम राहतील.

५) महाराष्ट्र राज्य ग्राम पोलीस पाटील अधिनियम १९६७ मध्ये आवश्यकतेनुसार दुरुस्ती / सुधारणा करण्यासाठी समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. याप्रकरणी होणारा खर्च " २०५५, पोलीस ११० ग्राम पोलीस, (००) (०१) पोलीस पाटील व मेवास पाटील (२०५५०२२१), ५० इतर खर्च " या लेखाशिर्षाखालील मंजुर अनुदानातुन भागविण्यात यावा.

३. सदरचे आदेश १ एप्रिल, २०१९ पासून अमंलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१९०३०९१७१४०४२२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित

करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhaker D. Pawar

Digitally signed by Sudhakar D. Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c1ebd27661971090dc2c91d4bb9caabd4da394aa85829a09265097faf097ba5, cn=Sudhakar D. Pawar
Date: 2019.03.09 17:18:48 +05'30'

**( सु.धों. पवार )**
अवर सचिव, गृह विभाग

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा. राज्यमंत्री गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
४. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय मुंबई
५. मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल-१ ,महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई
८. महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), नागपूर.
९. सर्व विभागीय आयुक्त

१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व उपविभागीय अधिकारी ( जिल्हाधिकाऱ्यामार्फत)
१२. सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई व रेल्वे वगळून)
१३. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
१४. सर्व जिल्हा कोषागार/ उप कोषागार अधिकारी
१५. वित्त विभाग (सेवा-६/व्यय-७) मंत्रालय, मुंबई
१६. अवर सचिव (बीयुडी-१ ) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. निवडनस्ती (पोल-८).